# भगवान नित्यानंदांचे दर्शन व त्यांचे प्रज्ञान

१. “लोक जेव्हा बाबा मुक्तानंदांकडे येत आणि म्हणत, ‘माझ्यासमोर कित्येक अडचणी आहेत,’ तेव्हा बाबा नेहमी म्हणत, ‘भगवान नित्यानंदांना प्रार्थना करा. ते त्या अडचणी दूर करतील.’ आजपावेतो, ही गोष्ट खरी आहे. त्यांच्या आत ते सर्वकाही समाविष्ट आहे जे एका व्यक्तीला हवे असते — परम सत्य. ते पूर्णतया अचल आहेत. आणि हे महान गुरुजनांचे लक्षण आहे.”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

२. “भगवान नित्यानंद म्हणत, ‘हे ब्रह्मांड अनंत आहे आणि ते तुमचाच आत्मा आहे. या जगाला अंतरात्म्याच्या रूपात पाहा. जग हे तुमच्यापासून भिन्न नाही आणि तुम्ही जगापासून भिन्न नाही. तुमच्याच अंतरी तुमचा राम वास करतो आहे.’ ”

~ स्वामी मुक्तानंद

३. “बाहेरची प्रत्येक गोष्ट अंतरी सूक्ष्मरूपाने पूर्णतः विद्यमान आहे. ‘तुमच्या अंतरात शोध घ्या’, असे सांगून गुरुदेव भक्तांना त्यांच्या स्वतःच्या अंतरातील साम्राज्याचा शोध घेण्यास प्रवृत्त करीत. आणि ते स्वतःदेखील सदैव अंतर-लीन असत.”

~ स्वामी मुक्तानंद

४. “जे काही आहे ते नित्यानंदच आहे, दुसरे काही नाही फक्त नित्यानंद. तेच आहेत ब्रह्मानंद, तेच आत्मानंद, तेच आहेत मुक्तीचा आनंद आणि प्रेमानंदही तेच आहेत. जे काही आहे ते प्रेमच आहे, दुसरे काही नाही फक्त प्रेम.”

~ स्वामी मुक्तानंद

५. “बाबा जेव्हा गुरूंविषयी बोलत, तेव्हा ते नेहमी म्हणत, ‘गुरू ते आहेत जे तुमचे अज्ञान दूर करतात, जे अंधकाराचा विनाश करून तुमच्या अंतरंगात प्रकाश प्रकट करतात.’ ”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

६. “ते सर्वात्मा, ‘तत्त्वमसि’ पदाचे लक्ष्य, मुक्तानंदाचे हृदयविलासी, गणेशपुरीवासी श्री नित्यानंद सिद्धविद्यार्थ्यांना परमानंदाच्या अमृतवर्षावाने पूर्ण करून चिरशांती आणि नित्यतृप्ती प्रदान करोत.”

~ स्वामी मुक्तानंद

७. “तुम्ही जेव्हा भगवान नित्यानंदांच्या मुखकमलाचे दर्शन घेता, तेव्हा तुम्ही आपल्यासोबत प्रकाश घेऊन जाता. तेव्हा बाबा मुक्तानंदांचा शक्तिशाली संदेश आचरणात आणणे शक्य होते : ‘परस्पर देवो भव.’ तुम्हाला याचा बोध होणे शक्य होते की, भगवंत प्रत्येकात निवास करतो, भगवंत प्रत्येकाचा मित्र आहे, भगवंत प्रत्येकाचा आहे.”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

८. “मंदस्मित — मृदुल स्मित, कोमल स्मित, प्रेमळ स्मित, सस्नेह स्मित, कल्याणकारक स्मित. बाबा मुक्तानंदांनी आपले गुरू, भगवान नित्यानंद यांच्या स्मितहास्याचे सुंदर वर्णन केले आहे : श्रीगुरुदेव परमानंदात सतत मग्न असत. त्यांच्या तेजोमय मुखमंडलावर नेहमीच प्रसन्न, मधुर आणि करुणामय हास्य विलसत असे. वेळोवेळी, ते हसायचे आणि त्या हास्याचे पडसाद अजूनही माझ्या स्मृतिपटलावर उमटत असतात. स्मित करणे त्यांना आवडायचे. त्यांच्या याच हास्यप्रियतेमुळे लोक त्यांना ‘नित्यानंद’ म्हणजे नेहमी आनंदात राहणारे, असे संबोधू लागले.’ ”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

९. “माझे गुरुदेव म्हणत, ‘देव एकच आहे आणि तो प्रेमस्वरूप आहे.’ ”

~ स्वामी मुक्तानंद

१०. “मी माझ्या श्रीगुरूंची, भगवान नित्यानंदांची पूजा करतो कारण मी कोण आहे ह्याचे ज्ञान मला त्यांच्या कृपेमुळेच झाले; माझी अध्यात्मयात्रा परिपूर्ण झाली, ती त्यांच्याच कृपेमुळे; त्यांच्याच कृपेमुळे मी रंकाचा राजा झालो. . . . ते माझा श्वासरूपी प्राण आहेत, ते माझे जीवन आहेत, तेच माझे अंतरतम सत्य आहेत.”

~ स्वामी मुक्तानंद

११. “आपल्या गुरूंविषयी बोलताना बाबा म्हणत, ‘त्यांच्या प्रकाशाद्वारे जगत प्रकटते. त्यांच्याविना, ते अदृश्य राहते. संपूर्ण ब्रह्मांड त्यांच्याच आत्म्याचे तेज आहे. ते सर्वांचे आहेत. ते सर्वांचा आत्मा आहेत. त्यांच्या कृपेशिवाय, कोणालाही खरी शांती प्राप्त होऊ शकत नाही.’ ”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

१२. “भगवान नित्यानंद हे पूर्ण योगेश्वर होते. संपूर्ण विश्व त्यांच्यापासून भिन्न नाही हे ज्ञान असल्याने ते सदैव निजानंदात निमग्न असत. आत्म्याच्या अद्वैत अवस्थेत ते तल्लीन असत. सदासर्वकाळ आणि सर्व परिस्थितींमध्ये ते परमानंदमय अवस्थेत असत. या अखिल विश्वब्रह्मांडाला ते सतत स्वतःच्याच आनंदमय व्याप्तीच्या रूपात पाहत असत.”

~ स्वामी मुक्तानंद

१३. “माझे गुरुदेव परमानंदात लीन महापुरुष होते. ते जन्मसिद्ध होते. सर्वसामान्य दिसत असले तरी ते सर्वज्ञ होते. ते मनाच्याही पलीकडील स्थितीत पोहोचले होते. ते सतत स्वतःच्या अंतरानंदात मग्न राहत व अतिशय कमी बोलत. ते जे काही बोलत ते परम सत्यच असे.”

~ स्वामी मुक्तानंद

१४. “जे सुख तुम्हाला हवे आहे, ते सर्व तुमच्या आतच आहे. ते तिथे पूर्णपणे आहे, पूर्ण प्रकट आहे.”

~ भगवान नित्यानंद

१५. “ॐ नमः शिवाय' हे आदि भगवंताचे, आदि गुरूंचे नाव आहे ज्यांच्यातून इतर सर्व असंख्य गुरू अवतीर्ण झाले आहेत. ‘ॐ नमः शिवाय', तो मंत्र आहे ज्याने असंख्य सिद्धांना, असंख्य गुरूंना मोक्ष प्रदान केला आहे आणि तो शक्तीने ओतप्रोत आहे.”

~ भगवान नित्यानंद

१६. “दर्शनाला येणाऱ्या लोकांना ते सांगत, ‘मी प्रत्येक गोष्टीमध्ये आहे.' एकदा एका फोटोग्राफरने त्यांचा फोटो काढण्यासाठी त्यांची परवानगी मागितली. गुरुदेव म्हणाले, ‘या जगाचा फोटो काढ. मी जिथे नाही अशी एखादी तरी जागा आहे का? प्रत्येक गोष्टीत माझी झलक आहे.' ”

~ स्वामी मुक्तानंद

१७. “आपल्या अंतरात खोलवर जा व ध्यान करा; तुम्ही सुखी व्हाल.”

~ भगवान नित्यानंद

१८. “भगवान नित्यानंद म्हणत असत, ‘अरे जीवा! तू ते अंतसौंदर्य पाहिले पाहिजेस. ते किती मधुर, किती मोहक, किती आनंदपूर्ण आहे. अंतरातील त्या सागराचा एक थेंबदेखील बाहेर सापडू शकणार नाही. म्हणून, अंतर्मुख हो. ध्यान कर, ध्यान कर, ध्यान कर!' हा त्यांचा संदेश होता.”

~ स्वामी मुक्तानंद

१९. “*Secret of the Siddhas* [सीक्रेट ऑफ द सिद्धज्] या आपल्या ओजस्वी ग्रंथमध्ये बाबा मुक्तानंद त्यांच्या श्रीगुरूंच्या एकात्म स्थितीचे वर्णन करतात :

‘हे नित्यानंद, तुम्ही आनंदात निरंतर निमग्न असायचात. तुमचे नावच आनंद होते. तुम्ही जेव्हा हसायचात, तेव्हा तुमच्या शरीराच्या रंध्रारंध्रातून हर्ष व आनंदमस्ती अशा प्रकारे बाहेर पडायची, की जणू काही तुमचा आनंद तुमच्या त्वचेतून एकाएकी बाहेर पडून अतिशय वेगाने वाहू लागला आहे.’ ”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

२०. “श्रीगुरुदेवांचे लहान मुलांवर फार प्रेम होते. ते म्हणत की, लहान मुलांमध्ये आसक्ती आणि द्वेष हे अत्यंत अल्प प्रमाणात असतात आणि ती देवाचे प्रतिरूप असतात. म्हणूनच मुलांना खाऊ, गोळ्या, बिस्किटे, कपडे व इतर भेटवस्तू देण्यात त्यांना सदैव आनंद होत असे. जवळपासची मुले सामान्यतः त्यांच्या अवतीभोवतीच असत आणि दिवसभर कैलास निवासमध्ये मुलांचा किलबिलाट चालू असे. गुरुदेव त्यांच्यासाठी अनेक निरनिराळी खेळणी ठेवीत.”

~ स्वामी मुक्तानंद

२१. “श्रीगुरुदेवांच्या दर्शनाला हजारो लोक येत व येताना आपल्या भक्ती व प्रेमाचे प्रतीक म्हणून भेटवस्तू आणीत. शास्त्रग्रंथांमध्ये म्हटले आहे की, देव, गुरू, राजा आणि लहान मुले यांच्या भेटीस कधीही रिक्तहस्ताने जाऊ नये.”

~ स्वामी मुक्तानंद

२२. “श्रीगुरुदेव, शक्तिपाताद्वारे शिष्याची कुंडलिनी शक्ती जागृत करीत असत. ही कुंडलिनी शक्ती म्हणजे ब्रह्मांडीय चितीच आहे. ब्रह्मांडरूपात प्रकट होणाऱ्या दिव्य चितीचेच ते दुसरे नाव आहे.”

~ स्वामी मुक्तानंद

२३. “भगवान नित्यानंद एक विलक्षण महापुरुष होते. त्यांचे यशोगान गायल्याने, त्यांच्या स्मरणाने भावुक लोकांना शक्तिपात होत असे. आत्तादेखील त्यांच्या समाधीतून, त्यांच्या छायाचित्रांतून शक्ती प्राप्त होते. तत्त्वतः ते या जगताला अंतर्बाह्य पूर्ण व्यापून राहिले आहेत कारण असे महापुरुष सर्वात्म्यात लीन असतात, ते सर्वव्यापी असतात.”

~ स्वामी मुक्तानंद

२४. “भगवान नित्यानंदाची मूर्ती इतकी जिवंत आणि जागृत आहे की, प्रत्येक भक्ताला वाटेल की, तो वास्तवात भगवान नित्यानंदांच्या शक्तिपूर्ण सान्निध्यात बसला आहे.”

~ स्वामी मुक्तानंद

२५. “ध्यान करण्याची एक सोपी पद्धत सर्वांना सहजप्राप्त आहे. मी भगवान नित्यानंदांच्या मूर्तीकडे संकेत करून असे म्हणू शकतो, ‘मंदिरात विराजमान असलेल्या बडे बाबांवर ध्यान करा. तुमचे चित्त त्यांच्या स्वरूपावर स्थिर करा. तुमचे हृदय त्यांना समर्पित करा.’ ”

~ स्वामी मुक्तानंद

२६. “तुम्ही जर नितांत भक्तिभावाने या प्रतिमेचे दर्शन घेतलेत, तुम्ही जर या प्रतिमेच्या रहस्याच्या मर्मामध्ये खोलवर उतरलात आणि तिच्या नेत्रांत चमकणाऱ्या प्रेमाप्रति, तिच्या स्वरूपाला तेज प्रदान करणाऱ्या दीप्तीप्रति आणि तिला चेतन करणाऱ्या प्रकाशाप्रति संवेदनशील राहिलात, तर तुम्हाला भगवान नित्यानंदांच्या संपूर्ण वैभवाचे प्रत्यक्ष दर्शन होईल.”

~ स्वामी मुक्तानंद

२७. “माझे श्रीसद्गुरू, जे परमानंदमय आहेत, ज्यांचा शक्तिपातरूपी प्रसाद समाधीची, शून्यातीत चिदानंदाची अनुभूती करवतो — अशा परम कृपाळू सद्गुरूंचा, मी सदैव ऋणी राहीन.”

~ स्वामी मुक्तानंद

२८. “दर्शन ही एक अत्यंत गूढ प्रक्रिया आहे. ते केवळ स्थूल नेत्रांनी पाहणे नव्हे; ते वास्तवात ‘पाहणे’च होऊन जाणे होय, जे अंतरात घडते. याच कारणास्तव भारताच्या संतांनी दर्शनाचा महिमा गायला आहे. भगवान नित्यानंदांना नमन.”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

२९. “श्री भगवान नित्यानंद, केवळ कृपेद्वारे आपल्या भक्तांना ज्ञानदृष्टी प्राप्त करवून देत. प्रपंचामध्येच त्यांना ब्रह्म दाखवीत. नर-नारींना ते ‘परस्पर देवो भव’चा मंत्र शिकवीत असत.”

~ स्वामी मुक्तानंद

३०. “आपले मन स्थिर करण्यासाठी ऋषिमुनींनी ज्या एका अभ्यासाचे समर्थन केले आहे, तो आहे आपले लक्ष अशा एका महात्म्यावर एकाग्र करणे की, जे आसक्ती आणि द्वेष यांच्या पलीकडे पोहोचले आहेत. म्हणून तुम्ही जेव्हा भगवान नित्यानंदांच्या मुखकमलाचे ध्यान करता, तेव्हा तुम्हाला लगेच जाणवते की, तुम्ही अंतराकडे खेचले जात आहात; तुम्हाला आत्म्याची अनुभूती होते.”

~ गुरुमाई चिद्विलासानंद

©२०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®। सर्वाधिकार सुरक्षित।